चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१६ मार्च, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १५/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशाह, घुग्घुस, भद्रावती, शेंगाव, माजरी, ब्रम्हपुरी, चिमुर, सावली, पाथरी, गडचांदुर, कोरपना, सिंदेवाही, दुर्गापुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२९** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १५ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **३,८३,७५०/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

—————————————————————————————————————

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन वरोरा :—**

दिनांक **१५/०३/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **वरोरा** अंतर्गत लखमापुर मंदीर जवळ येथे ०१ आरोपी ईसम हा सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **वरोरा** येथे अप. क्र. **२३७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,४८०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **वरोरा** पोलीस करीत आहे.

—————————————————————————————————————

# अल्पवयीन मुलीस पळवुन नेणाऱ्या आरोपीस सक्त मजुरीची शिक्षा

पोलीस स्टेशन वरोरा अंतर्गत अल्पवयीन मुलीस पळवुन नेणाऱ्या आरोपींस दिनांक १५/०२/२०१९ रोजी **श्री. शेदाणी, जिल्हा सत्र न्यायाधीश क्रं ०२ सत्र न्यायालय वरोरा यांनी शिक्षा** ठोठावली आहे.

दिनांक २२/०४/२००८ रोजी मौजा अंबादेवी वार्ड वरोरा येथील रहिवासी फिर्यादी यांची नातीन अल्पवयीन असुन तिला **आरोपी नामे जावेद उर्फ समद खॉ शेख वय २३ रा. कुरली ता. उमरखेड, जि. यवतमाळ** याने तिला फुस लावुन पळवुन नेले अशा फिर्यादीच्या रिपार्ट वरून पोलीस स्टेशन वरोरा येथे अप.क्र. ११०/२००८ कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरिक्षक श्री. जी. एस. पिदुरकर, पोलीस स्टेशन वरोरा यांनी पुर्ण करून तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीस अटक करून तपासाअंती आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक **१६/०२/२०१९** रोजी **आरोपी नामे जावेद उर्फ समद खॉ शेख वय २३ रा. कुरली ता. उमरखेड, जि. यवतमाळ यास कलम ३६३ भादंवि मध्ये ०२ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व ५००/—रू दंड न भरल्यास ०१ महिना शिक्षा श्री. शेदाणी, जिल्हा सत्र न्यायाधीश क्रं ०२ सत्र न्यायालय वरोरा यांनी ठोठावली आहे. सदर प्रकरणात** सरकार तर्फे **ॲड. श्री. उराडे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपुर तर कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. कृष्णा बोरकर, पोस्टे वरोरा** यांनी काम पाहीले आहे.